तपासी अंमलदार करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): अहमदनगर **P.S.**(ठाणे): राहाता **Year** (वर्ष): 2021

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0032 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 09/02/2021 23:13 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 09/02/2021

**Time Period** (कालावधी): पहर 6 **Date To** ( दिनांक पर्यंत): 09/02/2021

**Time From** (वेळेपासून): 16:10 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 16:25 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 09/02/2021 **Time** (वेळ): 23:07 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 022 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 09/02/2021 23:06 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 6 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): केलवड,राहाता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विक्रम भाउसाहेब मुरादे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खडकेवाके ,राहाता ,राहाता ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खडकेवाके ,राहाता ,राहाता ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वाती गौतम मेश्राम | | | 1. स्वामी रेसिडेन्सी बसस्टॅण्ड ,राहाता, राहाता ,राहाता ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 6000 / रु रोख रक्कम | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 6,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद राहाता जि.अहमदनगरदि. 09/02/2021 मी विक्रम भाउसाहेब मुरादे वय 26 वर्श धंदा पोल्ट्री व्यवसाय, रा. खडकेवाके ता. राहाता जि.अहमदनगर मो.नं. 8788802544 / 9145153875 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास असुन, मी दि.09/02/2021 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर येथील पोलीस निरीक्षक श्री.पवरे यांचेषी संपर्क करुन एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची तक्रार सांगितली. त्याप्रमाणे पो.नि.श्री.पवरे यांनी मला लाचेची रक्कम व मोटार सायकल सह आडगाव ते केलवड जाणारे रोडवर सुरक्षित ठिकाणी दि.09/02/2021 रोजी दुपारी 1/45 वा सुमारास हजर राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी आज दि. 09/02/2021 रोजी आडगाव ते केलवड जाणारे रोडवर सुरक्षीत ठिकाणी हजर असताना त्या ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री. पवरे हे तेथे शासकीय वाहनाने सोबतचे स्टाफसह आले. पोलीस निरीक्षक श्री.पवरे यांनी माझी ओळख करून घेवून, त्यांची पोलीस निरीक्षक श्री पवरे, सापळा पथकातील कर्मचारी व सोबतचे पंचायत समिती विभागाचे पंच यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवरे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी शासकिय वाहनामध्ये बसलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.पवरे यांच्या सुचनेवरून दोन्ही पंचानी मला नांव, पत्ता विचारुन, माझी तक्रार विचारली असता मी वरील प्रमाणे नांव पत्ता सांगुन, माझी लाच मागणीची तोंडी तक्रार सांगितली की, माझे खडकेवाके येथे पोल्ट्री व्यवसाय आहे. माझे वडील भाउसाहेब रामभाउ मुरादे, चुलते विठठल रामभाउ मुरादे, व संजय रामभाउ मुरादे यांचे नांव मौजे खडकेवाके येथे गट नं.05 क्षे◌त्र. 66 आर, गट नं. 448 क्षेत्र 26 आर, गट नं. 358 क्षेत्र 1 हेक्टर 54 आर, गट नं. 444 क्षेत्र 1 हेक्टर 7 आर असे गट आहेत. त्यांनी आपसात रजिश्टर वाटणी पत्र व हक्क सोड पत्र केलेले आहे. त्याप्रमाणे वरील गटांचे वाटप होवुन फेरफार मिळण्यासाठी मी आज रोजी वाटप पत्र, हक्क सोड पत्र व आवष्यक ते कागदपत्रासह तिन प्रकरणे खडकेवाके गांवचे तलाठी श्रीमती मेश्राम यांची केलवड तलाठी कार्यालय येथे सकाळी 11/00 वा.भेट घेवुन नोंदीसाठी दिले व त्यांना याप्रमाणे नोंदी करून फेरफार देण्याची विनंती केली. त्यावेळी वरील गटांचे वाटप व हक्क सोडपत्र नोंदी घेवुन फेरफार देण्यासाठी श्रीमती-मेश्राम,तलाठी यांनी माझेकडे 7000/- रूपयांचे मागणी केली. त्या मागत असलेली रक्कम ही लाच असल्याने व मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी ती प्रकरणे परत घेवुन निघुन आलो. मी आज पुन्हा तलाठी श्रीमती मेश्राम यांची तलाठी कार्यालयात जावुन भेट घेणार आहे व त्यांना वाटनीपत्र व हक्क सोडपत्राची कागदपत्रे देवुन नोंदणी,फेरफार व उतायाची मागणी करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्याविरूध्द कायदेषिर कारवाई करावी. श्रीमती मेश्राम, तलाठी यांच्याषी माझा कोणताही आर्थिक देणे घेणेचा अगर उसणवारीचा व्यवहार नाही तसेच त्यांच्याषी भांडणतंटा किंवा वैर नाही. अषी तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर पो.नि श्री. पवरे◌ यांनी दिले सुचेने प्रमाणे मी माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून दिली. त्यावर मी सही केली. त्यानंतर पो.नि श्री. पवरे

व दोन्ही पंचानी मी लिहून दिलेल्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर मी तलाठी श्रीमती-मेश्राम यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि श्री. पवरे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकार्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हाताळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पो.नि श्री. पवरे यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकार्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकार्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पो.नि श्री. पवरे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 याना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पो.नि श्री. पवरे यांनी मला व पंच नं.1 अशांना माझेकडे व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन तलाठी श्रीमती-मेश्राम यांची भेट घेण्यासाठी माझे कडील बजाज प्लाटीना एम.एच. 17 एएस. 275 या मोटार सायकलवरून रवाना केले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह रवाना होवुन केलवड तलाठी कार्यालय येथे श्रीमती मेश्राम,तलाठी यांची भेट घेवुन वाटनी पत्राचे नोंदीचे प्रकरण दिले. त्यावेळी श्रीमती.मेश्राम,तलाठी यांनी माझेकडे पंच न. 1 यांचे समक्ष आमचे मौजे खडकेवाके येथील गटांचे वाटप होवुन फेरफार देण्यासाठी माझेकडे 7,000/-रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती 6,000/- रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे माझे मोटार सायकलवरून पो.नि श्री. पवरे हे थांबले त्या ठिकाणी परत निघुन आलो.त्यानंतर तेथे पो.नि श्री. पवरे यांनी माझेकडे व पंच नं.1 यांचेकडे रवाना केले पासुन घडले हकीकती बद्दल विचारता मी वरील प्रमाणे सविस्तर हकीकत सांगितली. त्यानंतर पो.नि श्री. पवरे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकार्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकुन ते मी व पंच नं.1 यांनी सांगितले हकीकती प्रमाणे असल्याची खात्री केली. तलाठी श्रीमती-मेश्राम यांनी आमचे मौजे खडकेवाके येथील गटांचे वाटप होवुन फेरफार देण्यासाठी माझ्याकडे 7,000/-रु लाचेची मागणी करून तडजोडीअंती 6,000/- रू. लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द केलवड तलाठी कार्यालय येथे लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर पो.नि श्री.पवरे यांनी तलाठी श्रीमती-मेश्राम यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 6,000/- रूपये त्यात 2000/-रु दराची 01 व 500/- रु दराच्या 8 चलनी नोटा असे समक्ष हजर केले. त्यानंतर अन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोना/चैधरी यांनी अन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे शर्टचे पुढील डाव्या खिश्यात ठेवुन दिली.तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यानंतर व्हाईस रेकार्डरसह मला व पंच नं.1 यांना तलाठी श्रीमती-मेश्राम यांची भेट घेण्यासाठी केलवड तलाठी कार्यालय येथे माझे मोटारसायकल वरुन दुपारी 16/10 वा चे सुमारास रवाना केले. पाठोपाठ पो.नि श्री. पवरे हे सापळा पथकासह येवुन तलाठी श्रीमती-मेश्राम यांचे विरूध्द केलवड तलाठी कार्यालय येथे सापळा लावला. त्यावेळी तलाठी श्रीमती-मेश्राम यांनी तलाठी कार्यालय मध्ये माझ्या कडुन पंच न. 1 यांचे समक्ष 6,000/-रुपये लाचेची रक्कम माझ्या कडुन दुपारी 4/25 वा सुमारास स्विकारली असता, लोकसेवक तलाठी श्रीमती-मेश्राम यांना रंगेहाथ पकडले. तलाठी श्रीमती-मेश्राम यांच्या टेबलाचे ड्राव्हर मधुन लाचेची रक्कम पंच 2 करवी हस्तगत करण्यात आली. त्यानंतर तलाठी कार्यालयात लोकसेवक तलाठी श्रीमती-मेश्राम यांची, माझी, पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी यांच्या आवश्यक त्या तपासण्या करण्यात आल्या, त्यानंतर गोदावरी उजवा कालवा, पाटबंधारे विभाग, राहाता येथील शासकीय विश्रामगृह येथे येवून तेथील कक्ष उपलब्ध करून घेवून, पंचनाम्याचे पुढील कामकाज केले.तरी यातील लोकसेविका श्रीमती स्वाती गौतम मेश्राम वय 37 वर्ष, धंदा नोकरी, तलाठी एकरुखे (अतिरीक्त कार्यभार सजा केलवड) ता.राहाता जिल्हा अहमदनगर वर्ग-3, राहणार- स्वामी रेसिडेन्सी, बस स्टण्ड मागे, ता.राहाता जिल्हा अहमदनगर. यांनी माझे वडील व चुलते यांचे नावे असलेल्या मौजे खडकेवाके येथे गट नं.05 क्षेत्र 66 आर, गट न. 448 क्षेत्र 26 आर, गट न. 358 क्षेत्र 1 हेक्टर 54 आर, गट न. 444 क्षेत्र 1 हेक्टर 7 आर या गटाचे वाटप व ह्यातीत पत्रा प्रमाणे वाटप होवुन फेरफार देण्यासाठी आज दि.09/02/2021 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंच साक्षीदार क.1 यांचे समक्ष केलवड ता.राहाता जि.अ.नगर येथील तलाठी कार्यालय येथे तडजोडीअंती 6,000/- रू. लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम आज दि.09/02/2021 रोजी पंच न.1 यांचे समक्ष तलाठी कार्यालय, केलवड ता.राहाता येथे दुपारी 4/25 वा. सुमारास स्विकारुन स्वतःचा आर्थीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले. म्हणुन माझी लोकसेविका श्रीमती स्वाती गौतम मेश्राम वय 37 वर्ष, धंदा नोकरी, तलाठी एकरुखे (अतिरीक्त कार्यभार सजा केलवड) ता.राहाता जिल्हा अहमदनगर वर्ग-3, राहणार- स्वामी रेसिडेन्सी, बस स्टण्ड मागे, ता.राहाता जिल्हा अहमदनगर. यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ( विक्रम भाउसाहेब मुरादे ) ( श्याम पवरे ) पोलीस निरीक्षक अन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर

13. Action (केलेली कारवाई): Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) or (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकारी-याचे नाव): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

**Rank** (पद):

**No.** (क्र.):

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव): राहाता

**District** (जिल्हा): अहमदनगर

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे अंमलदार अधिका-याची सही)

पोलीस ठाणे अंमलदार (stamp?)

राहाता पोलीस स्टेशन (stamp?)

Name (नाव): [illegible] Dada Bhoye

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): PCBN71873